Arts, Commerce College, Warwat Bakal , Tq.Sangrampur Dist. Buldhana 444202, &

## Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

# CERTIFICATE

**Impact Factor 6.261**
**(SJIF)**

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Ms.* ......प्रा. मोरे भास्कर निवृत्ती............

*Of*... दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा-अहमदनगर ...

*has published a paper on*... कर्जतचे श्री संत सद्गुरू गोदड महाराज ...

*Peer Reviewed International E-Research Journal Special Issue on* "**Human Rights Present Scenario and Challenges & Humanities**" *Published on Dated 5,November - 2019.*

Dr. Rajendra S.Korde
**Guest Editor**
Arts, Commerce College, Warwat Bakal ,
Tq.Sangrampur Dist. Buldhana 444202

*Prof. Virag Gawande*
*Director*
*Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati*

CamScanner

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November -2019

SPECIAL ISSUE-CCIV

# *Human Rights Present Scenario and Challenges & Humanities*







**Executive Editor:**
Prof. Virag S. Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr. Rajendra S.Korde
Arts, Commerce College,Warwat Bakal ,
Tq.Sangrampur Dist. Buldhana

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue
ISSN : 2348-7143
November 2019

## INDEX



| No. | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र ग्रामसंस्था : एक आकलन डॉ. विनोद उत्तमराव भालेराव | 10 |
| 2 | सामाजिक कादंबरी व अरुण साधूंची 'बहिष्कृत' दलित–ग्रामीण जीवनाचा अविष्कार श्री. गिरीधर शंकरराव काचोळे | 14 |
| 3 | रविंद्रनाथांच्या गीतांजलीमधील मृत्यूची रूपे डॉ. प्रविण कारंजकर | 19 |
| 4 | भारतातील वृध्दांची लोकसंख्या व वृध्दांची समस्या श्री आर. व्ही. कसारे | 23 |
| 5 | कर्जतचे श्री संत सद्गुरू गोदड महाराज प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | 29 |
| 6 | ग्रंथालय : कौशल्य विकास श्री सुरेन्द्र दि.अवथरे | 33 |
| 7 | *तहान : संक्रमण काळातील ग्रामीण जीवन प्रा. महेंद्र झालके* | 38 |
| 8 | बालकामगार आणि हक्क प्रा. सुधीर नारायणराव देशमुख | 42 |
| 9 | अन्नसंरक्षण डॉ.प्रा.विभा छ. घोडखांदे | 46 |
| 10 | शंकरराव कोल्हे यांचे जलसिंचन विषयक कार्य प्रा.झरेकर आर.एस. | 51 |
| 11 | लोकतांत्रिक भारत में महिलाओं की राजनीतिक सहभागिता प्रा. डॉ. किशोर बी. वासनिक | 57 |
| 12 | मार्क्सवादी समीक्षाविचार प्रा. डॉ.विजय रूपराव राऊत | 61 |
| 13 | धान उत्पादन खर्चाचे व उत्पन्नाचे विश्लेषणात्मक अध्ययन प्रा. डॉ.ए.बी.पटले | 65 |
| 14 | मेळघाट प्रदेशातीलपुनर्वसित वसाहतीच्या स्वरुपावर व्याघ्र प्रकल्पाच्या प्रभावाचे भौगोलिक विश्लेषण डॉ. प्रमोद म. बावणे | 71 |
| 15 | मी रांगेतच उभा आहे : भूषण रामटेके : एक चिकित्सक अध्ययन प्रा.डॉ.प्रशांत धनवीज | 75 |
| 16 | व्यक्तिमत्वाचा खेळात दिसणारा कार्यमान डॉ. उदय दा. मेंडुलकर | 81 |
| 17 | गलिच्छ वस्ती भारतातील एक सामाजिक समस्या प्रा. विशाखा मानकर | 85 |
| 18 | आदर्श गाव योजना आणि सामाजीक विकास प्रा. कमलेश मानकर | 90 |
| 19 | पर्यावरण आणि मानवी हक्क प्रा. डॉ. नलिनी भगत | 95 |
| 20 | मानवाधिकार : दहशतवादी कृत्य डॉ. अजय कारूजी मेश्राम | 99 |
| 21 | महिला आरक्षण विधेयक और राजनैतिक दलो की भूमिका प्रा. एच. पारधी | 103 |
| 22 | डॉ.सुरेशचन्द्र शुक्ल का हिन्दी नाट्य साहित्य में योगदान डॉ.परदेशी पी. बी. | 106 |





CamScanner

# कर्जतचे श्री संत सद्‌गुरू गोदड महाराज

प्रा. मोरे भास्कर निवृत्ती
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा-अहमदनगर

- **प्रास्ताविक** :- महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे असे आपण अभिमानाने नेहमी म्हणतो आणि ते खरे आहे. कारण मध्ययुगीन कालखंडातील संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्यापासून ते अर्वाचीन कालखंडातील संत गजानन महाराज, साईबाबा, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत संतांची मांदियाळीच महाराष्ट्र भूमीत अवतीर्ण झालेली दिसते. मराठी साहित्य या संत साहित्यामुळे समृध्द झालेले दिसते. अशा संतांपैकीच कर्जत, (जिल्हा- अहमदनगर) येथील श्री सद्‌गुरू गोदडमहाराज हे एक संत होत. ब्रह्मज्ञानाविषयी निष्ठा बाळगून, वैराग्य पत्करून, जनसामान्यांना सुसंस्काराचा मार्ग दाखविणारे कर्जतचे श्री संत सद्‌गुरू गोदडमहाराज हे आज अनेकांचे श्रध्दास्थान झालेले आहे.

- **सद्‌गुरू गोदडमहाराज चरित्र** :- श्री विठ्ठलभक्त सद्‌गुरू गोदडमहाराज यांचा जन्म कर्जत येथे शके १६७२, श्रावण शुध्द दशमी, पुष्य नक्षत्र गुरुवारी झाला. महाराजांचे जन्मनाव 'अमरसिंह' (अमृत, अमरनाथ) असे होते. स्वभावाने ते विरक्त, निर्भय, शिघ्रकोपी, क्षमाशील व ईश्वर भक्तीत रस घेणारे होते. वडील भिकाजीराजे भोसले हे राजस्थानातील उदयपूर (संस्थान) येथील पराक्रमी राजवंशातील होते. तर आई चंद्रभागा ही कर्जत येथील तोरडमल कुटुंबातील होती. या महान पतिव्रता पुण्यशील माऊलीच्या पोटी या दिव्य पुत्राचा जन्म झाला. त्यांचे बालपण आणि भगवद् भक्तीचा बराच काळ कर्जत येथे गेल्याने ही भूमी त्यांच्या पदस्पर्शाने पुण्यपावन व पवित्र झालेली आहे.

- **गुरू परंपरा** :- राजपुत्र अमरसिंह हे वयाने पाच वर्षांचे असतानाच त्यांच्या मनात वैराग्याविषयी भावना निर्माण झाली. बालवयातच ते 'विठ्ठल विठ्ठल' असा नाम मंत्र जपू लागले. विठ्ठल भक्ती व नाम मंत्र हा एकच ध्यास त्यांना लागला. पुढे वैराग्यवृत्तीने अनेक तीर्थक्षेत्री त्यांनी भ्रमण केले. या भ्रमंतीत दक्षिणेत पिंपाडे येथे त्यांची श्री. नारायणनाथ महाराजांशी भेट झाली. त्यांच्या चरणांवर अमरसिंहाने शिरसाष्टांग दंडवत घातला. हे नारायणनाथ म्हणजे श्री एकनाथांच्या शिष्य परंपरेतील एक होत. श्री गोदडमहाराजांच्या चरित्रात ही परंपरा या प्रमाणे सांगितली आहे.

**"मूळ गुरू आदिनारायण । तयाचा शिष्य विष्णु जाण ।**
**विष्णुचा शिष्य चतुरानन ।ब्रह्म पूर्ण जाणता ।। ४५।।**
**विष्णुचा शिष्य नारदमुनी । दत्तात्रेय तया पासोनी ।**
**जो का विख्यात त्रिभुवनी । हिंडे अवनी अवधूत ।।४६।।**
**दत्तात्रेयाचा जनार्दन । जनार्दने एकनाथ उपदेशून।**
**एकनाथे गावजी मुक्या लागोन । अनुग्रह जाण पै केला ।।४७।।**
**धर्मनाथे प्रेमळ रामनाथासी । उपदेश केला सायासी।**
**प्रेमळनाथे रामनाथसी । अनुग्रहासी पै केले ।।४९।।**
**रामनाथे उपदेशिले कृष्णनाथासी । कृष्णनाथे विठ्ठलनाथासी ।**
**तयाचा उपदेश नारायणासी । नारायणी गोदडासी उपदेशिले ।।५०।।"[१]**

यावेळी नारायणनाथांनी अमरसिंहांची योग्यता पाहून व उपदेश करून त्यांना आनंद संप्रदायाची दीक्षा दिली.

- **गोदडनाथ नामकरण** :- दीक्षा देत असताना नारायणनाथांनी आपल्या जवळील गोदडी अमरसिंहांच्या अंगावर घातली व तुळशीची माळ गळ्यात घातली आणि सांगितले की, 'यापुढे तुझे नाव गोदडनाथ (गोदडमहाराज), तू यापुढे सातपुडा पर्वतावर जाऊन तपश्चर्या करावी, तेथेच तुला श्री विठ्ठल दर्शन होईल'. असा आशीर्वाद दिला. यावेळपासून अमरसिंहांना गोदडमहाराज म्हणून ओळखले जाऊ लागले.

-

'गोदडी 'या शब्दात तीन वर्ण असून -



CamScanner

**"गो म्हणजे इंद्रिय जाण । व म्हणजे ब्रह्म पूर्ण ।**
**डी म्हणजे माया आपण । जग व्यापील मूळ ती ।।६३।।"**[२]

याशिवाय

**"गो म्हणजे इंद्रिय जाण । द म्हणजे करावे त्याचे दमण।**
**ड म्हणजे माया दुरी करण । गोवड अभिधान हा हेतू ।।६६।।"**[३]

एकूणच 'गोदड' या नामातून इंद्रियांचे दमन करून माया मोहापासून दूर राहावे हा विचारच जणू त्यातून प्रकटतो आहे. माणसाचे मन गूढ आशयाने व विषयाने भरलेले असते. माणसांच्या चांगल्या वाईट प्रवृत्तीला कारण मन असते. म्हणून ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात मनाची उकल करताना म्हटले आहे की, मन हे इंद्रिय व बुध्दी यांच्या संधीत राहत असून, ते नेहमी अहंकाराला डिवचत असते व क्षणात संकल्प करून आपल्याला हवी तशी मानसिक सृष्टी निर्माण करते. हे मन नेहमी मनोरथांच्या उतरंडी रचत असते व उतरवतही असते.

**"संकल्पे सृष्टी घडी। सवेचि विकल्पूनि मोडी।**
**मनोरथांच्या उतरंडी। उतरी रची ।।ज्ञा. १३-११४।।"**[४]

मानवाच्या अंतःकरण प्रवृत्तीचा विकास (अभय, सत्त्वशुध्दी, आत्मसंयम, दम, आर्जव, सौजन्य, अक्रोध, क्षमा, व्रतस्थता, अहिंसा, दया, श्रध्दा, क्षमा, नम्रता) वा सद्‌गुणांचा आग्रह येथे 'गोदड' शब्दातून प्रकटताना दिसतो.

- **विठ्ठलाचा साक्षात्कार** :- बालपणापासूनच सद्‌गुरू गोदडमहाराजांना विठ्ठल भक्तीचे वेड होते. साहजिकच

**'पांडुरंगी मन रंगले'** किंवा
**'गोविंदाचे गुण वेधिले'**

या काव्योक्तिप्रमाणे गोदडमहाराजांना पांडुरंगाचा ध्यास लागला.

**"नित्य करी विठ्ठल भजन । मन इच्छित गमना गमन ।**
**दगडाचे टाळ करी घेऊन । आनंदित मन सर्वदा ।।२७।।"**[५]

अशी १७ वर्षे गोदडमहाराजांनी सातपुडा पर्वतात तपश्चर्या केली. आणि श्री नारायणनाथ यांच्या म्हणण्यानुसार त्यांना येथे पांडुरंगाने दर्शन दिले. अशी त्यांच्या चरित्रात अख्यायिका आहे.

**"पाहावया गोदडाचे मन । स्वये आला रुक्मिणी रमण ।**
**वाणियाचा वेष धरूनी । आला आदि मायेस घेऊन ।।२९।।"**[६]

भेटीच्या वेळी पांडुरंगाने गोदडमहाराजांना पंढरीस येण्याविषयी उपदेश केला. त्यानुसार अकरा वर्षे चातुर्मासात गोदड महाराजांनी पंढरपूर येथे जाऊन नित्यनेमाणे विठ्ठल दर्शन घेतले.

मात्र पुढे पंढरीच्या एका मुक्कामात चंद्रभागेच्या वाळवंटात गोदडनाथांनी राहुटी ठोकली असता, एके दिवसी एक उच्च कुलीन स्त्री चंद्रभागेत पाणी भरण्यासाठी जात असता राहुटीच्या दोराला अडकून पडली. तिने गोदडमहाराजांविषयी राग व्यक्त केला. गोदडमहाराजांना ते सहन झाले नाही. तेव्हा पांडुरंगास ते बोलले

**"म्हणे देवा तुज आला कंटाळा । ऐसे वाटते मज ये वेळा ।**
**स्वये राहुनी निराळा । ही आबाळा केली आमुची ।।४२।।"**[७]

असे म्हणून आपल्या सोबत असलेला रथ, पताका, तंबू वगैरे चंद्रभागेच्या वाळवंटात त्यांनी पेटवून दिले. आत्मक्लेश करून देहत्यागाची तयारी केली. अग्नीमध्ये उडी टाकणार इतक्यात त्या गर्दीतून वाट काढीत ब्राह्मण वेषात प्रत्यक्ष पांडुरंग तेथे आले. घडला वृत्तान्त पांडुरंगाने समजावून घेतला. तेव्हा गोदडमहाराज म्हणाले, 'यापुढे आता आम्ही पंढरीस येणार नाही'.

**"गोदड म्हणे ते वेळी । आम्ही येथे येऊ न कधी काळी ।**
**आम्हा कंटाळला वनमाळी । म्हणोनि ये काळी जाहले असे ।।५१।।"**[८]

गोदडमहाराजांचे हे परम कठीण बोलणे ऐकूण पांडुरंगास दुःख झाले. त्यांनी गोदडमहाराजांची समजूत घातली व म्हटले,

**"जे भूमिसी जया होय जनन । तेचि तया महाक्षेत्र पूर्ण ।**
**तेच भूमिसी तया होय निर्वाण । सामुज्यस्थान प्राप्त तयासी ।।६२।।"**[९]

म्हणून श्री गोदडमहाराजांनी कर्जत येथे वास्तव्य केले. एवढेच नाही तर यावेळी पांडुरंगानी वचन दिले की,

**"तू समाधिस्त होशील जेथे / प्रतिवर्षी आम्ही येऊ तेथे ।**

ISSN : 2348-7143
November 2019

**ऐसे वदोनी पंढरीनाथे । भास्य तया दिधले ।।६४।।"[१०]**

असे सांगून ब्राह्मण वेषातील पांडुरंग गुप्त झाले अशी अख्यायिका आहे.

- ***गोदडनाथंची संजीवन समाधी झाली धाकटी पंढरी :-*** पांडुरंगाच्या आदेशाप्रमाणे गोदडमहाराजांनी आपल्या जन्मगावी कर्णग्रामी (कर्जत येथे) शके १७५९ माघ वद्य चतुर्थी मंगळवारी मध्यान्ही संजीवन समाधी घेतली. त्याच जागी श्री सद्‌गुरू गोदड महाराजांचे भव्य असे मंदिर उभे आहे. त्या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्यावरती पांडुरंगाची मूर्ती बसविलेली आहे. आज श्री सद्‌गुरू गोदड महाराज हे लोकांच्या श्रध्देचे मोठे तीर्थक्षेत्र बनले आहे. दरवर्षी आषाढ कृष्ण एकादशीला येथे मोठी रथ यात्रा भरते. गोदडमहाराजांना वचन दिल्याप्रमाणे दरवर्षी या यात्रेस स्वतः पांडुरंग येथे येतात. पांडुरंगाचे प्रत्यक्ष दर्शन मिळाल्याचे समाधान भाविकांना मिळते. त्यामुळे 'धाकटी पंढरी' म्हणूनच अनेक लोक कर्जतचा उल्लेख करतात.
- **रथोत्सव व हरिनाम सप्ताहांचे आयोजन :-** आषाढी कृष्ण एकादशीला कर्जत येथे होणारा रथोत्सव वा रथयात्रा ही भाविकांना मोठी भूषणावह वाटते. पंढरपूर येथे ज्याप्रमाणे आषाढी व कार्तिकीस चारही बाजूंचे रस्ते माणसांच्या गर्दीने फुलून जातात. तशीच या रथोत्सवाच्या वेळीही अलोट गर्दी कर्जत येथे होते. कर्जत परिसरात ही यात्रा म्हणजे एक अपूर्वाई असते.

याशिवाय कर्जत येथे श्री संत सद्‌गुरू गोदडमहाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन केले जाते. तसेच जन्मोत्सव सोहळाही दरवर्षी येथे आयोजित करून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. या निमित्ताने प्रवचने, कीर्तने आणि हरिजागरणे होतात. या माध्यमातून भक्त जनांना कीर्तन, प्रवचनांमधून मोठी प्रबोधनात्मक अशी खास मेजवाणीच उपलब्ध होते. सुसंस्कारांचा ठेवा या माध्यमातून लोकांना मिळतो. त्यामुळे वारकरी संप्रदायातील भाविक लोकात गोदडमहाराजांविषयी अढळ अशी श्रध्दा निर्माण झाली आहे.

- **वाड्.मयीन कामगिरी :-** श्री संत गोदडमहाराज यांनी लोक कल्याणार्थ आध्यात्माविषयक 'योग सिध्दांत', 'जगतारक', 'संत विजय', 'योगनिर्णय', 'गोदड रामायण', 'संवत्सरी' (६० वर्षांची सुत्रबध्द भविष्य शृंखला), 'अभंग' अशी साहित्य निर्मिती केली आहे. 'जगतारक' हा त्यांचा ग्रंथ प्रसिध्द असून त्याद्वारे त्यांनी जगाला उपदेश करून 'सुख आणि शांतीचा' महामंत्र देऊन भक्तिमार्ग दाखविला आहे. एकूण साठ संवत्सराची जी भविष्य कथने त्यांनी लिहून ठेवली आहेत, त्यातील त्या त्या वर्षाचे भविष्य दरवर्षी चेत्र शुध्द पाडव्याच्या दिवशी मंदिरात वाचले जाते. ते भविष्य ऐकण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होते. हे भविष्य खरे ठरल्याची प्रचिती लोक सांगतात. भविष्य वाचून झाल्यानंतर तो ग्रंथ पुन्हा बांधून ठेवला जातो.

तसे पाहिले तर संतांचे विचार हे दीपस्तंभासारखे कायम मार्गदर्शक ठरत आलेले आहेत. माणसाला माणूस म्हणून जगण्यास समर्थ बनविणे, माणसाला माणूसपण प्राप्त करून देणे, माणसामाणसांतील भेद नष्ट करणे, जातियतेला मूठमाती देणे आणि मानवतावादाची पूजा बांधणे तसेच सत्य काय, असत्य काय, विवेकसंपन्न काय आणि विवेकहीन काय, ज्ञान काय आणि अज्ञान काय या गोष्टींचा उलगडा संतांनी आपल्या साहित्यातून अनेक ठिकाणी केला आहे. उदाहरण सांगायचे झाल्यास

**"कुळ जाति वर्ण । हे आघवेचि गा अकारण।'**

असा जातिभेदरहित विचारांचा पुरस्कार स्वतः ज्ञानदेवांनी केला'.[११]

अगदी अशा विचारांना अनुसरूनच श्री गोदडमहाराजांनीही समाजप्रबोधन केले.

**"परि मायांध जाहले जन । नाही वैष्णवाची ओळखण ।<br>यालागी अधःपतन । न चुके जाण निश्चयेसी ।।४६।।<br>गोदड अवतार होय पूर्ण । करावया जगदोध्दारण ।<br>परी कोणा नाही ओळखण । विषयी पूर्ण व्यापिले ।।४७।।"[१२]**

किंवा

**"ब्राह्मण क्षत्रिय वैश्यजाण । तैसेचि शूद्र आपण ।<br>स्पर्शास्पर्श नाही कोणा लागून । आनंदित मन सर्वांचे ।।१२९।।"[१३]**

असे त्यांचे प्रबोधनात्मक जग उध्दारणाविषयीचे विचार खुद्द चरित्रकाराने चरित्रग्रंथात दिले आहेत.

शिवाय श्री गोदडमहाराज हे संत एकनाथांच्या परंपरेतीलच असल्याने एकनाथांच्या कीर्तन, प्रवचन, आरत्या, भारूडे अशा विविध रचनेतील विचारांचा प्रभाव त्यांच्या लोकाभिमुख विचारसरणीत दिसतो.

- **समारोप :-** संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संत मालिकेने अवघ्या महाराष्ट्राला जो भक्तीचा आणि सुसंस्कारांचा मार्ग दाखविला, तोच मार्ग श्री संत सद्‌गुरू गोदडमहाराजांनी दाखविला. या सर्वच संतांचे साहित्य हे महाराष्ट्र नव्हे तर भारतीय संस्कृतीचे भूषण आहे. सामाजिक जाणिवेतून या संत साहित्याची निर्मिती झाल्यामुळे आजच्या धकाधकीच्या जीवनात मानवी समाजाला आचार विषयक विचार देणारे हे साहित्य आहे. संत सहवास व संत दर्शन म्हणजे सद्‌विचारांचा आणि सद्‌भावनांचा वर्षाव होऊन सामान्य लोकांत योग्य कर्माची वाटचाल सुरू राहते. अशी विचारी लोकांची श्रध्दा आहे.

**'यहो याहो अवघे जन । करा गोवड समाधिसी वंदन ।।'**

अशा या विचार व श्रध्देमुळेच कर्जत पंचक्रोशीतील अनेक लोक श्री गोदडमहाराजांच्या समाधी स्थळी नित्यनेमाने येतात. श्रध्देने समाधीचे दर्शन घेतात. एवढेच नाही तर अनेक जण समाधीचे दर्शन घेतल्याशिवाय आपल्या कामाला सुरुवात करताना दिसत नाहीत.

**'कर्जत आमुचे पंढरपूर'**

अशी या तीर्थ क्षेत्राविषयीची श्रध्दा व मनोधारणा अनेकांच्या मनात आहे. यातच श्री संत सद्‌गुरू गोदडमहाराज यांचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे.

- **संदर्भ :-**

१. दासमल्हार ॐ विराचित, श्री सद्‌गुरू गोदडमहाराज चरित्र, यशवंत ऑफसेट कर्जत, अध्याय तिसरा, आवृत्ती पहिली २००६, पृ. १५
२. तत्रैव, पृ. १७
३. तत्रैव, पृ. १७
४. न्यायाचार्य श्री नामदेव महाराजशास्त्री, ज्ञानेश्वरी विशेष चिंतन, साकेत प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली २०१५, पृ. ११
५. दासमल्हार ॐ विरचित, श्री सद्‌गुरू गोदडमहाराज चरित्र, यशवंत ऑफसेट कर्जत, अध्याय चौथा, आवृत्ती पहिली २००६, पृ. २०
६. तत्रैव, पृ.२१
७. तत्रैव, अध्याय आठवा, पृ. ४७
८. तत्रैव, पृ. ४८
९. तत्रैव, पृ. ४८
१०. तत्रैव, पृ. ४८
११. नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, सातवी आवृत्ती १९९७, पृ. ६२
१२. दासमल्हार ॐ विरचित, श्री. सद्‌गुरू गोदडमहाराज चरित्र, यशवंत ऑफसेट कर्जत, अध्याय ६, पृ. ३६
१३. तत्रैव, अध्याय अकरावा, पृ. ७५